माहिती व जन संपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका

"कृपया प्रसिध्दी करिता

कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र. टिजीओ/ 3572
दिनांक: 22/10/2026

प्रेस नोट

पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागात महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल!

पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामध्ये प्रथमच महिला सेवक श्रीमती वंदना पाटसकर यांना पेठ निरीक्षक म्हणून कामकाज करण्याची संधी देण्यात आली आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाने महिलांच्या कार्यक्षमतेवर विश्वास व्यक्त करत त्यांना जबाबदारीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महिलांना प्रशासकीय कामकाजात अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या नेतृत्वगुणांना प्रोत्साहन देणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे, या दृष्टीने हा घेण्यात आला आहे. महिलांना योग्य संधी आणि जबाबदारी दिल्यास त्या प्रशासकीय क्षेत्रातही प्रभावीपणे योगदान देऊ शकतात, याचे हे सकारात्मक उदाहरण आहे.

श्रीमती वंदना पाटसकर यांना मिळालेली ही संधी केवळ वैयक्तिक गौरव नसून, महिला कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी आणि इतर महिलांना प्रोत्साहित करणारी बाब आहे. या निर्णयामुळे विभागातील महिला कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल आणि प्रशासनातील महिला सहभागाला नवी दिशा मिळेल.

(रवि पवार)
उप आयुक्त
कर आकारणी व कर संकलन विभाग